**महाराष्ट्र शासन**
**वित्तीय सल्लागार व उप सचिव,**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, ८ वा मजला,**
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१**

**दूरध्वनी क्र- ०२२ २२६१६८२३/६९४१** **Email ID: fadsmumbai.mhpds@gov.in**

क्र. विसउस/कार्या. ३ (नोंदणी)/जडवस्तुसंग्रह/ १३ दिनांक :- ०७/०४/२०२६

## निविदा सूचना

वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई येथील निरुपयोगी, ना दुरुस्त वस्तूंची (२८ लोखंडी कपाट, ६ लोखंडी रॅक व २ लाकडी कपाट) विक्री करण्याकरीता मोहरबंद लिफाफ्यात निविदा मागवण्यात येत आहेत. सदर निविदा संदर्भात नियम व अटी सोबत जोडल्या आहेत.

अधिकृत भंगार खरेदी धारकांना वस्तुंची पाहणी करून सदर निविदा दिनांक ०८.०४.२०२६ ते दि. १५.०४.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत पोहचतील अशा मोहरबंद लिफाफ्यामध्ये पाठवाव्यात. दर पत्रकांचे स्वतंत्र व आवश्यक असलेले कागदपत्रांचे स्वतंत्र असे दोन्ही लिफाफे एका सिलबंद लिफाफ्यात भरुन पाठवाव्यात.

विहित वेळेतील प्राप्त निविदा दि.१६.०४.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उपसंचालक यांच्या दालनात त्यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकानां उपस्थित राहण्यास परवानगी आहे. सदर निविदाधारक हजर न राहील्यास त्याच्या गैरहजेरी मध्ये निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. याबाबत निविदाधारकाचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाही. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी. (सोबत निविदेसंदर्भातील अटी व शर्ती तसेच विक्री करण्यात येणा-या वस्तूंच्या नावाची यादी जोडली आहे.)

(श्री. संजय गोरे)
उपसंचालक
वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय

**उपसंचालक**
**वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक**
**संरक्षण विभाग, मुंबई-400001.**

Scanned with OKEN Scanner

## निवीदे संदर्भातील अटी व शर्ती

१. मोहरबंद लिफाफ्यात निविदा दिनांक ०८.०४.२०२६ ते दिनांक १५.०४.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, जी.टी.हॉस्पीटल कॉम्प्लेक्स इमारत, ८वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१ येथे सादर करावी. मोहरबंद पाकीटावर सदर वस्तुंचा नावानिशी स्पष्ट उल्लेख असावा.

२. 'जसे आहे तशा स्थितीत' विक्रिकरीता असलेल्या वस्तुं हया मार्केट बिल्डींग, १ ला मजला, अभ्युदय बँक शेजारी, एल.एम.नाडकर्णी मार्ग, ओल्ड बी.पी.टी.कॉलनी, नाडकर्णी पार्क, वडाळा, मुंबई - ४०० ०३७ येथे ठेवण्यात आलेल्या आहे. सदर नावानिशी वस्तुंच्या निविदा सादर करणाऱ्या इच्छुकाला निविदेमधील सामान पाहण्यासाठी मार्केट बिल्डींग, वडाळा या ठिकाणी दिनांक ०८.०४.२०२६ ते १५.०४.२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाहता येईल. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवशी सामानाची पाहणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

३. ज्यांना रजिस्टर पोष्टाने निविदा पाठवायची आहे. त्यांनी दिनांक १५.०४.२०२६ पर्यंत सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने पाठवावी किंवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

४. इसाऱ्याची रक्कम रु.३,०००/- रक्कमेचा ACCOUNTS OFFICER CIVIL SUPPLIES MUMBAI या नावाने डिमांड ड्राप्ट अथवा रोखीने कार्यालयातील रोखपाल यांच्याकडे जमा करावे. इसाऱ्याची रक्कम भरलेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. आवश्यक असलेले कागदपत्रांचा स्वतंत्र तांत्रिक लिफाफा व दरपत्रकांचा स्वतंत्र वाणिज्य लिफाफा अशी दोन्ही लिफाफे सिलबंद करुन एका लिफाफ्यात भरुन पाठवावीत. (Technical and Financial चे वेगवेगळे लिफाफे एकाच लिफाफ्यात घालावीत.) तसेच वजना प्रमाणे / प्रति किलोप्रमाणे / प्रति नगाप्रमाणे दर नमूद करावेत. तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेल्या निविदाकारांचेच वाणिज्यिक लिफाफे उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

६. अयशस्वी निवीदा धारकांची इसाऱ्याची रक्कम परत केली जाईल.

७. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

८. निविदा पाकीटावर खरेदीधारकाने आपले संपूर्ण नाव व पत्ता मोबाईल नंबर नमुद करावा. तसेच कोणकोणत्या वस्तुंसाठी निविदा सादर करत आहे ते पाकीटावर नमूद करावे.

९. यशस्वी निविदाधारकास, निविदा सफल झाल्याचे कळविल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवडयात वस्तूंचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबादल ठरविली जाईल व इसारा रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१०. यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल.

११. वित्तीय सल्लागार व उपसचिव हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

१२. जर जडसंग्रह वस्तुंची योग्य ती किंमत निविदाधारकाकडून न आल्यास निविदा नामंजूर करणे, स्थगीती देणे तसेच कोणतीही पूर्व सुचना न देता निविदा रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार हे वित्तीय सल्लागार व उपसचिव यांनी राखून ठेवले आहेत.

१३. सदर वस्तू खरेदी व हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१४. प्रशासकीय किंवा तांत्रीक कारणास्तव वरील निविदा सादर करावायाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

१५. पॅनकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ मधील नमुना "ग" प्रमाणपत्र, इनकमटॅक्स रिटर्ण मागील वर्षाचा, संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र किंवा संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र, आधार कार्ड, गूमास्ता/उद्यम रजीस्ट्रेशन प्रमाणपत्र, इत्यादी दस्तऐवज असणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज बंद पाकिटामध्ये सादर करावे.

१६. ज्या निविदा धारकांची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे त्याने मंजूरी दिनांकापासून ७ दिवसांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून) दरपत्रकात नमुद रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

१७. निरुपयोगी साहीत्य ताब्यात घेताना इमारतीचे अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदारास नुकसानीबाबत जबाबदार धरुन संबंधीताकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल.

१८. खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यामधून कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात येणार नाही. कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील.

१९. दर पत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(श्री. संजय गोरे)
उपसंचालक
वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय

**उपसंचालक**
**वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक**
**संरक्षण विभाग, मुंबई-400001.**

Scanned with OKEN Scanner

विक्री करावयाच्या वस्तुंची यादी

| अ.क्र. | वस्तुंचे नाव | वस्तुंची एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | लोखंडी कपाट | २८ |
| २ | लोखंडी रॅक | ६ |
| ३ | लाकडी कपाट | २ |

(श्री. संजय गोरे)
उपसंचालक
वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय

**उपसंचालक**
**वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक**
**संरक्षण विभाग, मुंबई-400001.**

Scanned with OKEN Scanner